WEBSITE : ATULYAMAHARASHTRA.COM RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

दैनिक अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | सोमवार, 21 सप्टेंबर 2026 | अंक क्र. 130 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे



# शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजारांची मदत द्या; रोहित पवारांची मागणी

## बीडमध्ये २४ सप्टेंबरला शेतकरी प्रश्नांवर मोठ्या आंदोलनाची हाक



■ बीड :प्रतिनिधी

मराठवाड्यातील दुष्काळजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आमदार रोहित पवार आक्रमक झाले आहेत. अंबाजोगाई तालुक्यातील दगडवाडी येथे त्यांनी करपलेल्या शेतीची आणि पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. पावसाने ओढ दिल्याने पिकांचे मोठे नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडल्याचा दावा त्यांनी केला.

पिकांची पाहणी केल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी सरकारकडे शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची मदत देण्याची मागणी केली. यासोबतच मजुरांना आर्थिक मदत, जनावरांसाठी चारा छावण्या आणि दुष्काळग्रस्त तालुक्यांबाबत तातडीने निर्णय घेण्याची मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, २४ सप्टेंबर रोजी बीड शहरात शेतकरी प्रश्नांवर मोठे आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा रोहित पवार यांनी केली. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातून शेतकरी या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

रोहित पवार यांनी धाराशिव जिल्ह्यात ८० टक्क्यांपेक्षा जास्त पिकांचे नुकसान झाल्याचा दावा करत बीडमध्येही पावसाची मोठी तूट असल्याचे म्हटले. शेतकरी हवालदिल असताना सरकारकडून अद्याप ठोस मदत जाहीर झालेली नाही, असा आरोप त्यांनी केला. पीकविम्याची थकीत रक्कम, कर्जमाफी, मागील वर्षीच्या अतिवृष्टीची मदत आणि दुष्काळग्रस्त तालुक्यांचा प्रश्न २४ सप्टेंबरच्या आंदोलनात उपस्थित केला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

जनावरांना चारा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांवर जनावरे विकण्याची वेळ आली आहे, त्यामुळे तातडीने चारा छावण्या सुरू कराव्यात, अशी मागणीही रोहित पवार यांनी केली. कर्नाटकात दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर निर्णय घेतले जात असताना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनाही तातडीने मदत मिळावी,



अशी मागणी करत २४ सप्टेंबरच्या आंदोलनातून सरकारसमोर शेतकऱ्यांच्या मागण्या तीव्रपणे मांडण्याचा इशारा रोहित पवार यांनी दिला.

# पुढील 2-3 दिवस प्रचंड महत्त्वाचे; पावसाबाबत हवामान विभागाचा मोठा अंदाज

■ मुंबई : वृत्तसंस्था

बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा परिणाम महाराष्ट्राच्या हवामानावर दिसून येत आहे. राज्यातील अनेक भागांत पावसाला सुरुवात झाली असून, पुढील 2 ते 3 दिवस विविध जिल्ह्यांमध्ये हलका ते जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाच्या सरी आणि सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात 30 ते 40 किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहू शकतात. तसेच काही ठिकाणी विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे. पालघर, ठाणे, मुंबई आणि रायगडमध्येही हलका ते मध्यम पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

उत्तर महाराष्ट्रातील धुळे, नंदुरबार आणि जळगावमध्ये काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरी पडू शकतात. नाशिक आणि अहिल्यानगरला यलो अलर्ट देण्यात आला असून, येथे वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, पुणे घाटमाथा, सातारा, सातारा घाटमाथा, कोल्हापूर, सांगली आणि सोलापूर या भागांतही यलो अलर्ट देण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांना यलो



अलर्ट आहे. पुढील 2 दिवस या भागात पावसाची शक्यता कायम राहणार आहे.

विदर्भातील अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा आणि यवतमाळमध्येही यलो अलर्ट देण्यात आला आहे. काही भागांत विजांसह वादळी वारे आणि जोरदार पाऊस होऊ शकतो. दरम्यान, पुढील 2 ते 3 दिवस राज्यातील अनेक भागांत पावसाचा जोर कायम राहण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या पावसाचा शेतीवरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

# लालबागच्या राजाच्या मंडपात मुखदर्शनाच्या रांगेत शॉर्टसर्किट

■ मुंबई : वृत्तसंस्था


मुंबईतील लाडक्या बाप्पांपैकी एक असलेल्या जगप्रसिद्ध लालबागच्या राजाच्या दर्शनासाठी सध्या देशभरातून भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे. अशातच लालबागच्या राजाच्या मुखदर्शनाच्या रांगेत अचानक शॉर्टसर्किट झाल्याची एक खळबळजनक घटना समोर आली आहे. दर्शनासाठी रांगेत उभ्या असलेल्या भाविकांमध्ये अचानक झालेल्या या स्पार्किंगमुळे काही काळ भीती आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.(

### सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

मिळालेल्या माहितीनुसार, बाप्पाच्या मुखदर्शनासाठी हजारो भाविक रांगेत उभे असताना अचानक वाहिनीमध्ये स्पार्क झाल्याने ठिणग्या उडाल्या. त्यामुळे रांगेत काहीशी धावपळ उडाली. मात्र, सुदैवाने कोणतीही मोठी जीवितहानी किंवा दुखापत झाल्याचे वृत्त नाही. घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी आणि सुरक्षा रक्षकांनी ताबोडतोब धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली असून परिसराची पाहणी केली जात आहे.(Lalbaugcha Raja Short Circuit)

### काळाचौकी दुर्घटनेनंतर नागरिकांमध्ये चिंता

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वीच काळाचौकी येथील महागणपतीच्या मंडपाजवळ अचानक विजेचा करंट लागून दोन जणांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली होती. ती दुर्घटना ताजी असतानाच आता थेट लालबागच्या राजाच्या दर्शनाच्या रांगेत



शॉर्टसर्किटची घटना घडल्याने गणेशोत्सवातील सार्वजनिक सुरक्षेचा आणि आपत्कालीन व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा गंभीरपणे ऐरणीवर आला आहे. भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रशासनाने अधिक सतर्क राहण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर २८ सप्टेंबरला पाणी प्रश्नावर मोर्चा

## माजी आ. भीमराव धोंडे आष्टी,पाटोदा, शिरूर का.च्या सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी गोदावरी-कृष्णा खोऱ्यातील पाणी देण्याची मागणी

■ आष्टी प्रतिनिधी :

आष्टी,पाटोदा आणि शिरूर (का.) तालुक्यांतील सिंचन व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवावा या मागणीसाठी दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. गोदावरी व कृष्णा खोरे प्रकल्पातील पाणी योग्य नियोजनाद्वारे या तीन तालुक्यांना उपलब्ध करून द्यावे अशी मागणी माजी आ. भीमराव धोंडे यांनी केली आहे.

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन दिल्यानंतर माजी आ.भीमराव धोंडे यांनी हॉटेल अन्विता येथे पत्रकार परिषद घेतली.

या वेळी माजी आ. बाळासाहेब आजबे,महेश सह कारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. अज यदादा धोंडे, पाटोदा तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे दीपक घुमरे,भाऊसाहेब भराटे (आष्टी वि धा नसभा अध्यक्ष),अशोक साळवे (आष्टी तालुकाध्यक्ष, आरपीआय), नियामत बेग (माजी सभाप ती), अनिल जायभाये (माजी सभापती), महेश सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन दादा साहेब जगताप, सरपंच ज्ञानेश्वर वाघ, माजी सरपंच बाळासाहेब पवार, भागवत वारे, सुरेश राख, बाबा साहेब ससाणे,महारुद्र खेडकर,दत्ता सातपुते यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

माजी आ.भीमराव धोंडे यांनी पत्रकार प रिषदेत बोलताना सांगितले की,या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना पत्र दिले आहे। मोर्चाच्या दिवशी जल सं पदा विभाग, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास म हा मंडळ, गोदावरी खोरे विकास महामंडळ तसेच सं बंधित तांत्रिक व प्रशासकीय विभागाच्या सक्षम अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, अशी मागणी त्यांनी केली आहे।

२८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ या वेळेत हा मोर्चा काढण्यात येणार आहे. मोर्चातील शिष्ट मं डळासोबत संबंधित अधिकाऱ्यांची चर्चा घडवून आणून पाणीप्रश्नावर तातडीने ठोस कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. कमी पावसामुळे चालू खरीप हंगामातील ऊस,सोयाबीन, तूर,मूग,कापूस, उडीद आणि बाजरी या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजा र रुपये अनुदान देण्याची मागणी आहे. जनाव रांच्या चारा व पाण्यासाठी मोठ्या जनावरास १०० रुपये आणि लहान जनावरास ५० रुपये प्रतिदिन अनुदान थेट खात्यावर वर्ग करावे, अशी मागणीही माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केली आहे. आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यांना सातत्याने पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे, सिंचना अभावी शेतीचे प्रश्न गंभीर झाले आहेत। पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या पाण्याचीही अडचण निर्माण होत आहे.



### शेतकऱ्यांना मदतीची मागणी

■ खरीप पिकांच्या नुकसानीमुळे शेतकरी आर्थिक संकटात आहेत। बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्याची मागणी आहे पशुधनाच्या चारा व पाण्यासाठीही प्रतिदिन मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे.२८ सप्टेंबरच्या मोर्चा वेळी जलसंपदा विभाग आणि संबंधित महामंडळांच्या अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे शिष्टमंडळा सोबत चर्चा करून मागण्यांवर ठोस कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे

■ — भीमराव धोंडे, (माजी आमदार)

### तालुक्यांना शाश्वत पाण्याची गरज : माजी आ. आजबे

■ आष्टी,पाटोदा आणि शिरूर (का.) तालुक्यातील पाणी प्रश्न हा केवळ आजचा प्रश्न नसून या भागाच्या भवितव्याशी निगडीत आहे. सिंचनासाठी पिण्याच्या पाण्यासाठी या तालुक्यांना शाश्वत पाण्याची गरज आहे। गोदावरी आणि कृष्णा खोऱ्यातील शिल्लक पाणी या दुष्काळग्रस्त भागाला मिळण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घ्यावा पाणी प्रश्नाच्या कायमस्वरूपी सोडवणुकीसाठी दि.२८ सप्टेंबरच्या मोर्चात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे.



# वीस दिवसापासून मोकाट असणाऱ्या डॉ.महेंद्र पटवाला अटक करा ग्रामस्थांचे कडा पोलीस चौकासमोर ठिय्या आंदोलन

■ **आष्टी: प्रतिनिधी**

कडा शहरातील एका खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या १९ वर्षीय तरुणीशी केबिन बंद करून अश्लील कृत्य करणारा आरोपी डॉक्टर महेंद्र पटवाला २० दिवस उलटूनही अटक न झाल्याने नागरिकांचा संताप अनावर झाला आहे. आरोपी डॉक्टरला तातडीने बेड्या ठोकण्याच्या मागणीसाठी शहरातील शेकडो संतप्त नागरिकांनी आज, शनिवारी (दि. १९) सकाळी कडा पोलीस चौकीत सुमारे दीड तास जोरदार ठिय्या आंदोलन केले. येत्या चार दिवसांत आरोपीला अटक न केल्यास कडा शहर बेमुदत बंद ठेवण्याचा आक्रमक पवित्रा नागरिकांनी घेतला आहे.

आष्टी तालुक्यातील कडा येथील एका खाजगी रुग्णालयात ३० ऑगस्ट रोजी ही घटना घडली होती. उपचारासाठी आलेल्या भावी शिक्षिका असलेल्या १९ वर्षीय तरुणीला डॉ. महेंद्र पटवा याने केबिनमध्ये बोलावून, दरवाजा आतून बंद करत तिच्याशी अश्लील कृत्य केले होते. याप्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून आष्टी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ७४, ७५(१) आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. घटनेनंतर झालेल्या मारहाणीत संबंधित डॉक्टर पटवाचा हात फ्रॅक्चर झाल्याने त्याच्यावर अहिल्यानगर येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मात्र, तब्बल २० दिवस उलटूनही आरोपीला अटक न झाल्याने शहरवासीयांमध्ये तीव्र असंतोष पसरला.

शनिवारी सकाळी १० ते ११:३० दरम्यान शेकडो नागरिकांनी पोलीस चौकीत ठिय्या मांडला. प्रशासनाने तात्काळ पावले उचलून आरोपीस गजाआड करावे, अशी मागणी करत चार दिवसांत कारवाई न झाल्यास कडा शहर बेमुदत बंद ठेवण्याचा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला. हे निवेदन परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे आणि कडा सहायक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

दरम्यान आंदोलकांची बाजू ऐकून घेत परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक भारत पांढरे यांनी जमावाला शांत केले. "पुढील ४ ते ५ दिवसांत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून आरोपीला गजाआड केले जाईल," असे ठोस आश्वासन पोलीस प्रशासनाने दिले. या आश्वासनानंतर नागरिकांनी आपले ठिय्या आंदोलन मागे घेतले. यावेळी सहायक पोलीस निरीक्षक नाना सूर्यवंशी, पोलीस हवालदार भाऊसाहेब आहेर, नंदकिशोर सवासे, अमोल नवले, गणेश भुतेकर, भारत गुजर, चंद्रमुनी बनसोडे, विकास जाधव, सद्दाम शेख, महिला अंमलदार मर्जीना शेख यांच्यासह होमगार्ड जवानांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.






## सरस्वती गणेश मंडळाचा सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमांचा धडाका; 'माणुसकीची भिंत'सह विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ **अंबाजोगाई प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सरस्वती सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, गुरुवार पेठ, अंबाजोगाई यांच्या वतीने यंदा विविध सामाजिक, सांस्कृतिक व जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांची सुरुवात १४ सप्टेंबर २०२६ पासून झाली असून, सरस्वती कॉर्नर, गुरुवार पेठ येथे प्रमुख कार्यक्रम पार पडणार आहेत.

मंडळाच्या वतीने 'माणुसकीची भिंत' हा स्तुत्य उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत जुने कपडे, ग्रंथ, रद्दी पेपर तसेच ई-वेस्ट संकलित करण्यात येत आहे. 'नको असेल ते द्या, हवे असेल ते घेऊन जा' या संदेशातून गरजूंसाठी मदतीचा हात पुढे करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. फिरत्या माणुसकीच्या भिंतीचे अनावरण प्रसाद दादा, शेख मुख्तार चाचू, रुपेश रामावत व शिवानंद हारंगुळे यांच्या हस्ते करण्यात आले.

महंत महारुद्र महाराज खाडे शास्त्री संचलित शिवगड संस्थान, उमराई येथेही मंडळाच्या वतीने सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. यावेळी मुलांना खेळाचे साहित्य देण्यात आले. माजी नगराध्यक्ष महादुजी मस्के, प्रकाश बोरगावकर, शशिकांत नाना गायकवाड यांच्यासह सरस्वती गणेश मंडळाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. गणेशोत्सव काळात महिलांसाठी कौशल्य शिबिर, रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर, अन्नदान, महिला सक्षमीकरण, शिलाई मशीन व मेकअप किट वाटप, सीड बॉल्स उपक्रम, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, योग-प्राणायाम, ज्येष्ठ नागरिकांना साहित्य वाटप आदी विविध उपक्रम घेण्यात येणार आहेत.

तसेच क्रेडाईच्या संयुक्त विद्यमाने बांधकाम कामगारांना सुरक्षा साहित्याचे वाटप, गरजू वस्त्यांमध्ये शालेय स्पर्धा व विविध वस्तूंचे वाटप करण्यात येणार आहे. महिलांसाठी विशेष 'महिला होम मिनिस्टर' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, विजेत्यांसाठी विविध बक्षिसे व ट्रॉफी ठेवण्यात आल्या आहेत. याशिवाय 'कोण बनेल अंबाजोगाईचा होम मिनिस्टर?' या विशेष उपक्रमासह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे.

रक्ताची गरज लक्षात घेता नागरिकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करावे, असे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. प्रत्येक रक्तदात्यास स्व. प्रकाशचंदजी सुरजमलजी मुथा यांच्या स्मरणार्थ छोटीशी भेटवस्तू देण्यात येणार आहे.

विविध स्पर्धा व शिबिरांसाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून, सामाजिक उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रायोजकांनी मंडळाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

- **रचना परदेशी – 9422288898**
- **अलोक मोदी – 9890774788**
- **गौरव शर्मा – 9175022255**
- **निलेश मुथा – 9422242083**
- **योगेश परदेशी – 9420581251**

## कतरिनाच्या ट्रोलिंगवर सलमान खान संतापला

■ **मुंबई : वृत्तसंस्था**

कतरिना कैफ नुकतीच पती विक्की कौशलसोबत गणपती उत्सवात सहभागी झाली होती. त्यावेळी तिच्या वाढलेल्या वजनावरून आणि बदललेल्या लूकवरून सोशल मीडियावर तिला मोठ्या प्रमाणात ट्रोल करण्यात आले. या प्रकारानंतर अनेक कलाकार तिच्या समर्थनासाठी पुढे आले आहेत. आता या प्रकरणात सलमान खानने देखील ट्रोलर्सना सडेतोड उत्तर दिले आहे.

बिग बॉस 20 च्या वीकेंड का वार एपिसोडमध्ये सलमान खान ट्रोलर्सवर चांगलाच भडकला. वयावरून आणि शारीरिक बदलांवरून ट्रोल करणाऱ्यांचा त्याने तीव्र शब्दांत समाचार घेतला. यावेळी सलमान खान इतका रागावला की त्याने कॅमेऱ्यासमोरच स्वतःचे शर्ट काढून दाखवले. तसेच चेहऱ्यावरील मेकअप काढून त्याने ट्रोलर्सना थेट आव्हान दिले. सलमान म्हणाला की, प्रत्येक शोमध्ये लोकांच्या वयावर भाष्य केले जाते. मी 60 वर्षांचा झालो आहे, मग नक्की कोणत्या गोष्टीवरून कोणाला ट्रोल करायचे असते? लोकांचे वजन, लूक, हसणे, अपयश किंवा एखाद्या स्त्रीचे आई होणे यावरून टीका केली जाते, जे अत्यंत चुकीचे आहे. ट्रोल करण्यापूर्वी लोकांनी स्वतःचा चेहरा आणि शरीर पाहिले पाहिजे. प्रेक्षकांनी चित्रपटाचे तिकीट खरेदी केले आहे, कलाकारांना विकत घेतलेले नाही. ज्या दिवशी कलाकार उत्तर देतील, त्या दिवशी ट्रोलर्सना लपायला जागा मिळणार नाही. कतरिनाचे थेट नाव न घेता सलमान पुढे म्हणाला की, बाळंतपणानंतर कोणत्याही स्त्रीचे वजन वाढणे ही अत्यंत नैसर्गिक गोष्ट आहे. जेव्हा ती पुन्हा चित्रपटांमध्ये काम करेल, तेव्हा ती स्वतःला नक्कीच फिट करेल. सलमान खानने घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे सोशल मीडियावर त्याची जोरदार चर्चा सुरू आहे. कतरिनाच्या समर्थनार्थ उभे राहून ट्रोलर्सची बोलती बंद केल्याबद्दल अनेकांनी सलमानच्या या कृतीचे कौतुक केले आहे.



## 'गोलमाल 5' कधी रिलीज होणार? रोहित शेट्टीने केली मोठी घोषणा

### 'गोलमाल 5' कधी येणार ?

'गोलमाल' फ्रँचायझीचे आतापर्यंत चार चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आले असून, प्रत्येक भागाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे पाचव्या भागाची चाहत्यांना मोठी उत्सुकता होती. ही प्रतीक्षा आता संपली आहे. दिग्दर्शक रोहित शेट्टी यांनी शनिवारी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर 'गोलमाल 5'चे पोस्टर शेअर करत रिलीज डेट जाहीर केली. चित्रपट 8 जानेवारी 2027 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होणार आहे.

### पोस्टरमध्ये दिसली जुनीच धमाल

रिलीज डेट जाहीर करताना शेअर करण्यात आलेल्या पोस्टरमध्ये अजय देवगण बाईकवर दिसत आहेत. त्यांच्यासोबत अर्शद वारसी, श्रेयस तळपदे, तुषार कपूर आणि कुणाल खेमू हे देखील मजेशीर अंदाजात दिसत आहेत. रोहित शेट्टी यांनी पोस्टसोबत, "हास्य-मस्ती, आनंद आणि कुटुंब... बस, आणखी काही नाही. 8 जानेवारी 2027." असे कॅप्शन लिहिले आहे.

### अजय देवगण-रोहित शेट्टी पुन्हा एकत्र

'गोलमाल' फ्रँचायझीच्या यशामध्ये अजय देवगण आणि रोहित शेट्टी या जोडीचा मोठा वाटा आहे. आता दोघेही पाचव्या भागासाठी पुन्हा एकत्र आले आहेत. रिपोर्ट्सनुसार, अजय देवगणसोबत अर्शद वारसी, श्रेयस तळपदे, कुणाल खेमू, शर्मन जोशी आणि तुषार कपूर हे कलाकारही चित्रपटात दिसण्याची शक्यता आहे.

### यावेळीही मिळणार कॉमेडीचा फुल डोस?

'गोलमाल'च्या चित्रपटांची ओळख म्हणजे भन्नाट कॉमेडी, मजेदार गैरसमज आणि एका पाठोपाठ घडणाऱ्या गोंधळलेल्या घटना. पाचव्या भागातही प्रेक्षकांना याच धाटणीची धमाल पाहायला मिळण्याची अपेक्षा आहे. आता 8 जानेवारी 2027 रोजी 'गोलमाल 5' थिएटरमध्ये दाखल होणार असल्याने चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढली आहे.



गोलमाल' फ्रँचायझीच्या चाहत्यांसाठी अखेर मोठी आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. 'गोलमाल 5'च्या रिलीज डेटची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. अजय देवगण आणि रोहित शेट्टीची लोकप्रिय जोडी पुन्हा एकदा प्रेक्षकांना हसवण्यासाठी सज्ज झाली आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया चा मुंबईत कॅम्पस सुरु

जागतिक स्तरावरील पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये स्थान असलेली आणि ऑस्ट्रेलियाच्या प्रतिष्ठित ग्रुप ऑफ एट ची संस्थापक सदस्य असलेली युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया ने नुकताच मुंबईत आपला अधिकृत कॅम्प्स सुरु केला. वेस्टर्न ऑस्ट्रेलिया आणि महाराष्ट्र यांचायतील शिक्षण,अर्थव्यवस्था आणि परस्पर मानवी सम्रधांच्या वाढत्या प्रक्रियेतील हा एक महत्वपूर्ण टप्पा आहे. वेस्टर्न ऑस्ट्रेलियाचे प्रीमिअर [मुख्यमंत्री ] माननीय रॉजर कुक आणि महाराष्टरचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील मरोळ स्थित वोटरस्टोन येथे ऑस्ट्रेलियन कॅम्पस चे उदघाटन केले. भारतात स्वतःच्या मालकीचे कॅम्प्स स्थापन करण्यासाठी आणि चालविण्यासाठी ऑस्ट्रेलिया वेस्टर्न युनिव्हरसिटीने सुमारे ८० दशलक्ष ऑस्ट्रेलियन डॉलर्सची तरतूद केली आहे. यातून भारताप्रती असलेली आपली दीर्घकालीन कटिबद्धता आणि भारत वेस्टर्न ऑस्ट्रेलिया यांच्यात शिक्षण,उद्योग ,संशोधन आणि कौशल्य याना जोडणारी कायमस्वरूपी उपस्थिती निर्माण करण्याची आपली महत्वाकाशा यूडबल्यूए ने अधोरेखीत केली. मुंबईतील हा कॅम्प्स भारतातील यु डबल्यू ए च्या दोन कॅम्प्स पैकी पहिला असून चेन्नई येथील कॅम्प्स ऑकटोबर २०२६ मध्ये सुरु होणार आहे. या कॅम्प्स च्या उदघाटनप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना वेस्टर्न ऑस्ट्रेलिया चे प्रीमिअर,माननीय रॉजर कुक म्हणाले,"युनिव्हर्सिटी ऑफ ऑस्ट्रेलिया च्या मुंबई कॅम्पस चे उदघाटन हा भारत आणि महाराष्ट्र यांच्यासोबत वेस्टर्न ऑस्ट्रेलिया चे वाढत चाललेले संबंध अधिक दृढ करण्याच्या दिशेने एक महत्वपूर्ण टप्पा आहे. वेस्टर्न ऑस्ट्रेलियाची मुंबईत गेल्या ३० वर्षांपासून उपस्थिती आहे. आणि हे संबंध लोक ,ज्ञान,कौशल्य,तंत्रज्ञान आणि सामायिक संधी यावर आधारित आहेत. यु डब्लू ए चा मुंबई कॅम्प्स हे याच समबंधांचे मूर्त रूप आहे."




# IGBC द्वारा मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला 'ग्रीन बिल्डिंग सर्टिफिकेशन' प्रदान



शाश्वत पायाभूत सुविधा, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि पर्यावरणपूरक विकासाप्रती असलेल्या कटिबद्धतेची दखल घेत, 'कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्री' अंतर्गत कार्यरत असलेल्या 'इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिल'ने 'मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड'ला 'लाइन ३' (UGC पॅकेज क्र. ३) मधील पाच मेट्रो स्थानकांसाठी 'ग्रीन बिल्डिंग सर्टिफिकेशन'ची (हरित इमारत प्रमाणपत्राची) फलक प्रदान केली. या पॅकेजमध्ये जगन्नाथ शंकरशेठ मेट्रो (मुंबई सेंट्रल), महालक्ष्मी मेट्रो, सायन्स सेंटर, आचार्य अत्रे चौक आणि वरळी या पाच स्थानकांचा समावेश आहे.

यूजीसी पॅकेज क्र. ३ ची अंमलबजावणी डोगुसोमाने केली असून, ग्रीनट्रीने हरित इमारत सल्लागार म्हणून काम पाहिले. हे प्रमाणपत्र मोठ्या प्रमाणावरील शहरी वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये शाश्वतता समाकलित करण्यावर, तसेच सुलभता, संसाधनांचे संवर्धन आणि पर्यावरणीय कामगिरी सुधारण्यावर प्रकल्पाचे असलेले लक्ष दर्शवते.प्रमाणित स्थानकांचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे मुंबईच्या व्यापक सार्वजनिक वाहतूक नेटवर्कशी त्यांचे एकीकरण. सर्व स्थानके १०० मीटरच्या आत असलेल्या बस थांब्यांवरून पोहोचण्यायोग्य आहेत आणि येथे प्रवाशांना उतरवण्यासाठी समर्पित जागा (ड्रॉप-ऑफ झोन्स) आहेत.




# माजी मंत्री धनंजय मुंडे यांची सोशल मीडियावर बदनामी फेसबुक युझर 'Prem V Dhas' वर गुन्हा दाखल

बीड -महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि परळी मतदारसंघाचे आमदार धनंजय मुंडे यांची सोशल मीडियावर (फेसबुक) आक्षेपार्ह आणि मानहानीकारक भाषेत बदनामी केल्याप्रकरणी बीडच्या सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार Prem V Dhas या फेसबुक आयडी धारकाने आपल्या अकाऊंटवरून परळी मतदारसंघाचे आमदार आणि राज्याचे माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्याविरुद्ध अर्वाच्य भाषेत शिवीगाळ, धमकी व अपमानकारक पोस्ट करून सोशल मीडियावर बदनामी केली असे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी अजिंक्य आनेराव यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. सायबर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक एन. एन. उबाळे यांनी हा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक स्वप्निल के. उनवणे (सायबर पोलीस स्टेशन, बीड) करत आहेत.

# फेरेरो रोशर आता बार स्वरूपात”

फेरेरो इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या जागतिक फेरेरो ग्रुपचा भाग असलेल्या कंपनीने फेरेरो रोशर बार्सच्या लाँचची घोषणा केली, ज्याद्वारे ब्रँडने भारतातील प्रीमियम बार विभागात प्रवेश केला आहे. विशिष्ट फेरेरो रोशर अनुभव एका नवीन स्वरूपात आणताना हे बार काळजीपूर्वक निवडलेले घटक, अनोखा स्वाद आणि ब्रँडच्या ओळखल्या जाणाऱ्या सुवर्ण ओळखीचा संगम साधतात. स्मूथ चॉकलेट, क्रीमी फिलिंग आणि कुरकुरीत हेझलनट्सच्या फेरेरो रोशरचे सिग्नेचर मिश्रण असलेला हा बार भारतातील सर्वात लोकप्रिय चॉकलेट स्वरूपाला नवीन संवेदनात्मक अनुभव देतो. फेरेरो रोशरने गुणवत्ता, कारागिरी आणि बहु-संवेदनात्मक अनुभवाच्या विशिष्ट संयोजनाभोवती आपले स्थान निर्माण केले आहे. फेरेरो रोशर बार्ससह, ब्रँड हा सिग्नेचर अनुभव आगळ्यावेगळ्या स्वरूपात विस्तारत आहे, जो ग्राहकांना फेरेरो रोशरचा आनंद घेण्याचा नवीन मार्ग प्रदान करतो, मग तो वैयक्तिक आनंदाचा क्षण असो किंवा इतरांसोबत शेअर करण्याची गोष्ट असो. हा बार विशिष्टरित्या डिझाइन करण्यात आला आहे, जिथे फेरेरो रोशरची डिझाइन बारवर कोरलेली आहे, जी आयकॉनिक फेरेरो रोशरच्या टेक्सचरचे वैशिष्ट्य दर्शवते आणि स्मूथ व लज्जतदार भागांसह बदलते.




# मॅरेथॉन धावपटू रमाबाई रणवीरला सचिनकडून रनिंग शूजची भेट

क्रिकेटचा महान खेळाडू सचिन तेंडुलकरने महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील ४७ वर्षीय एकल माता रमाबाई रणवीर यांना पाठिंबा दर्शवला आहे. आपल्या मुलींच्या शिक्षणासाठी मदत करण्याच्या त्यांच्या दृढनिश्चयाने नुकतेच लक्ष वेधून घेतले, जेव्हा त्यांनी अनवाणी मॅरेथॉन धावून ३,००० रुपयांचे बक्षीस जिंकले.त्यांच्या कहाणीने भारावून जाऊन, तेंडुलकरने रमाबाईंना रनिंग शूजची एक जोडी भेट देऊन पाठिंबा देण्याची इच्छा व्यक्त केली. रमाबाईंकडे फोन नसल्यामुळे, त्यांच्या टीमने *टेन एक्स यू*च्या माध्यमातून ओळखीच्या व्यक्तींमार्फत त्यांच्याशी संपर्क साधला आणि अंबाजोगाई येथे त्यांच्यापर्यंत शूज पोहोचवण्याची व्यवस्था केली. जेव्हा त्यांना शूज देण्यात आले, तेव्हा त्यांनी विचारले की ज्या व्यक्तीने त्यांना मॅरेथॉनबद्दल सांगितले होते, त्यांनाही एक जोडी देता येईल का. त्या म्हणाल्या की, त्यांच्या प्रोत्साहनाशिवाय कदाचित त्यांनी या शर्यतीत कधीच भाग घेतला नसता. तिची विनंती पुढे नेत, *रमाबाई, तिच्या दोन मुली आणि ज्या मॅरेथॉन आयोजन समितीच्या सदस्याने तिला या कार्यक्रमाबद्दल माहिती दिली होती, त्या सर्वांसाठी शूजची व्यवस्था करण्यात आली.

संकलन –संयोजन : सुबोध रणशेवरे



# अल्झायमर : विस्मरणातही वृद्धत्वाचा सन्मान जपूया

२१ सप्टेंबर हा दिवस जगभरात 'जागतिक अल्झायमर दिन' म्हणून पाळला जातो. अल्झायमर हा केवळ स्मरणशक्ती कमी होण्याशी संबंधित आजार नसून तो व्यक्तीच्या दैनंदिन जीवनावर, कुटुंबीयांशी असलेल्या संबंधांवर, सामाजिक सहभागावर आणि आत्मसन्मानावर परिणाम करणारी गंभीर आरोग्यविषयक आणि सामाजिक समस्या आहे. विशेषतः वृद्ध व्यक्तींमध्ये विस्मरणाच्या तक्रारी आढळल्यास त्याकडे केवळ 'वय झाले म्हणून असे होते' या दृष्टिकोनातून पाहणे योग्य नाही. वृद्धत्व ही जीवनाची नैसर्गिक अवस्था आहे; परंतु वृद्ध व्यक्तीच्या स्मरणशक्तीत होणारे गंभीर आणि सातत्यपूर्ण बदल हे तपासणी व योग्य वैद्यकीय मार्गदर्शनाची गरज दर्शवू शकतात. त्यामुळे जागतिक अल्झायमर दिन हा केवळ एका आजाराबद्दल जनजागृती करण्याचा दिवस नसून वृद्ध व्यक्तींच्या आरोग्याचा, सन्मानाचा, स्वायत्ततेचा आणि माणूस म्हणून त्यांच्या असलेल्या मूलभूत अधिकारांचा पुनर्विचार करण्याचा दिवस आहे.

वृद्धत्वाकडे समाजाने अनेकदा दुर्बलता, परावलंबित्व आणि निष्क्रियता यांच्याशी जोडून पाहिले आहे. प्रत्यक्षात वृद्ध व्यक्तींच्या आयुष्यातील अनुभव, ज्ञान, कौशल्ये, सामाजिक संबंध आणि जीवनातून मिळालेली शिकवण ही कुटुंबाची तसेच समाजाची मौल्यवान संपत्ती असते. अनेक वृद्धांनी आपल्या कुटुंबाच्या उभारणीसाठी आयुष्यभर कष्ट केलेले असतात. शेती, उद्योग, व्यवसाय, नोकरी, शिक्षण, सामाजिक कार्य किंवा घरगुती जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी पुढील पिढ्यांसाठी भक्कम आधार निर्माण केलेला असतो. त्यामुळे वय वाढले किंवा स्मरणशक्ती कमी झाली म्हणून व्यक्तीचे महत्त्व कमी होत नाही. अल्झायमरच्या आजारामुळे काही आठवणी पुसट होत गेल्या तरी त्या व्यक्तीचे आयुष्य, अनुभव, भावना, नाती आणि मानवी प्रतिष्ठा कायम असते. म्हणूनच अल्झायमरकडे पाहताना आजारापेक्षा आधी माणसाकडे पाहण्याची गरज आहे.

सामान्य वृद्धत्वामध्ये काही प्रमाणात विस्मरण होणे स्वाभाविक असू शकते. एखादी वस्तू कुठे ठेवली हे क्षणभर आठवणे कठीण जाणे, एखाद्या व्यक्तीचे नाव लगेच आठवू न येणे किंवा एखादी गोष्ट आठवण्यासाठी थोडा अधिक वेळ लागणे यासारख्या घटना वयानुसार घडू शकतात. मात्र विस्मरणाचे प्रमाण वाढत जाऊन त्याचा दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ लागला, परिचित व्यक्ती ओळखता येईनाशा झाल्या, नेहमीची कामे करण्यात अडचण निर्माण झाली, संभाषणात वारंवार गोंधळ होऊ लागला किंवा व्यक्ती परिचित ठिकाणीही दिशाभूल होऊ लागली तर त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. अल्झायमर हा स्मृतिभ्रंशाच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. त्यामुळे वृद्ध व्यक्तीच्या वर्तनातील किंवा स्मरणशक्तीतील सातत्यपूर्ण बदलांकडे दुर्लक्ष न करता वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घेणे महत्त्वाचे ठरते.

अल्झायमरच्या संदर्भात सर्वांत मोठी समस्या म्हणजे त्याच्याभोवती असलेले गैरसमज होय. अनेक कुटुंबांमध्ये वृद्ध व्यक्ती विसरभोळ्या झाल्या की त्यांना 'वयामुळे असेच होते' असे सांगून विषय संपवला जातो. काही वेळा वृद्ध व्यक्ती वारंवार एकच प्रश्न विचारतात, एखादी गोष्ट पुन्हा सांगतात किंवा एखादी वस्तू चुकीच्या ठिकाणी ठेवतात म्हणून त्यांची चेष्टा केली जाते. अशा वर्तनामुळे वृद्ध व्यक्तीच्या मनावर खोल परिणाम होऊ शकतो. त्यांना आपण कुटुंबासाठी ओझे आहोत, आपल्यामुळे इतरांना त्रास होतो किंवा आपली किंमत उरलेली नाही, अशी भावना निर्माण होऊ शकते. त्यामुळे विस्मरणाची लक्षणे दिसणाऱ्या वृद्ध व्यक्तीशी संयमाने, प्रेमाने आणि आदराने संवाद साधणे ही कुटुंबाची महत्त्वाची जबाबदारी आहे.

आधुनिक जीवनशैलीमुळे कुटुंबव्यवस्थेत मोठे बदल झाले आहेत. संयुक्त कुटुंबांची संख्या कमी होऊन लहान कुटुंबांची संख्या वाढली आहे. रोजगार, शिक्षण आणि स्थलांतराच्या कारणामुळे मुलांना आपल्या वृद्ध आई-



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

वडिलांपासून दूर राहावे लागते. अशा परिस्थितीत वृद्ध व्यक्तींच्या शारीरिक आरोग्याबरोबरच त्यांच्या मानसिक आणि सामाजिक आरोग्याचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. एकटेपणा, संवादाचा अभाव, सामाजिक सहभाग कमी होणे आणि भावनिक आधाराची कमतरता यामुळे वृद्ध व्यक्ती अधिक असुरक्षित होऊ शकतात. अल्झायमर किंवा इतर प्रकारच्या स्मृतिभ्रंशाची लक्षणे असलेल्या वृद्धांसाठी ही परिस्थिती अधिक आव्हानात्मक असते. त्यामुळे वृद्धांची काळजी ही केवळ औषधे देण्यापुरती मर्यादित न राहता त्यांच्याशी नियमित संवाद साधणे, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांना सामाजिक जीवनात सहभागी करून घेणे आवश्यक आहे.


अल्झायमरच्या रुग्णांची काळजी घेताना कुटुंबीयांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची असते. मात्र ही जबाबदारी एका व्यक्तीवर टाकल्यास काळजीवाहू व्यक्तीवर शारीरिक, मानसिक आणि आर्थिक ताण वाढू शकतो. वृद्ध व्यक्तीची काळजी घेणाऱ्या कुटुंबीयांना अनेकदा झोपेचा अभाव, सततची चिंता, वेळेचे बंधन, आर्थिक खर्च आणि सामाजिक जीवनातील मर्यादा यांचा सामना करावा लागतो. त्यामुळे अल्झायमरच्या रुग्णाची काळजी ही केवळ एका मुलाची, मुलीची किंवा जोडीदाराची जबाबदारी न राहता संपूर्ण कुटुंबाची सामूहिक जबाबदारी असली पाहिजे. घरातील प्रत्येक सदस्याने आपल्या क्षमतेनुसार वेळ देणे, काळजीची कामे वाटून घेणे आणि काळजीवाहू व्यक्तीलाही विश्रांती व भावनिक आधार देणे आवश्यक आहे.

वृद्ध व्यक्तीच्या स्वाभिमानाचा प्रश्न येथे विशेष महत्त्वाचा आहे. स्मरणशक्ती कमी झाली म्हणून त्यांच्याशी लहान मुलाप्रमाणे वागणे, त्यांच्या निर्णयक्षमतेकडे पूर्णपणे दुर्लक्ष करणे किंवा प्रत्येक गोष्ट त्यांच्या हातातून काढून घेणे योग्य नाही. त्यांच्या क्षमतेनुसार त्यांना स्वतःची कामे करण्याची संधी देणे आवश्यक आहे. सुरक्षिततेचा विचार करताना त्यांची स्वायत्तताही जपली पाहिजे. कपडे निवडणे, आवडीचे अन्न सांगणे, घरातील छोट्या कामांत सहभागी होणे, परिचित व्यक्तींशी बोलणे किंवा आपल्या आवडीच्या उपक्रमात वेळ घालवणे यांसारख्या गोष्टी वृद्ध व्यक्तीला आत्मविश्वास देतात. 'तुम्हाला काहीच कळत नाही' अशी भूमिका घेण्याऐवजी 'तुम्ही काय करू शकता आणि आम्ही कुठे मदत करू शकतो' हा दृष्टिकोन अधिक मानवी आहे.


वृद्ध व्यक्तींच्या मानसिक आरोग्याकडेही तितक्याच गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. वाचन, संगीत ऐकणे, जुन्या आठवणी सांगणे, कुटुंबातील मुलांशी संवाद साधणे, प्रार्थना किंवा ध्यानधारणा करणे, घरातील हलकी कामे करणे, बागकाम, फिरणे किंवा सामाजिक कार्यक्रमांत सहभागी होणे अशा उपक्रमांमुळे वृद्धांना मानसिक आणि सामाजिक सक्रियता मिळू शकते. अर्थात, कोणताही उपक्रम हा व्यक्तीच्या आरोग्यस्थिती, आवडी आणि क्षमतेनुसार असावा. 'काहीच करू नका, विश्रांती घ्या' अशी सततची भूमिका वृद्धांना अधिक एकाकी करू शकते. वृद्धत्व म्हणजे जीवनापासून निवृत्ती नव्हे; तर आयुष्याच्या अनुभवांना नव्या स्वरूपात जगण्याची संधी आहे.

आरोग्यदायी जीवनशैलीलाही अल्झायमर आणि इतर स्मृतिभ्रंशाच्या संदर्भात महत्त्व आहे. नियमित शारीरिक हालचाल, संतुलित आहार, पुरेशी झोप, रक्तदाब आणि मधुमेहासारख्या आरोग्यविषयक स्थितींचे नियंत्रण, धूम्रपान व तंबाखूजन्य पदार्थांपासून दूर राहणे आणि सामाजिक व मानसिक सक्रियता यांचा एकूण मेंदूच्या आरोग्याशी संबंध आहे. मात्र यापैकी कोणतीही गोष्ट अल्झायमरपासून पूर्ण संरक्षणाची हमी देत नाही. त्यामुळे 'हा आजार केवळ जीवनशैलीमुळे होतो' किंवा 'योग्य आहार घेतला तर तो होणारच नाही' असे अतिसुलभीकरण टाळणे आवश्यक आहे. वृद्ध व्यक्तीच्या आरोग्यात बदल जाणवल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे हाच योग्य मार्ग आहे.

ग्रामीण भागातील वृद्ध व्यक्तींच्या संदर्भात हा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा होतो. गावांमध्ये अनेक वृद्ध शेती, घरगुती कामे किंवा पशुपालनाशी संबंधित कामे करत असतात. त्यांच्याकडे औपचारिक आरोग्यसेवा सहज उपलब्ध असेलच असे नाही. आर्थिक मर्यादा, वाहतुकीची अडचण, तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता आणि अल्झायमरविषयी अपुरी माहिती यामुळे निदानाला विलंब होऊ शकतो. काही वेळा कुटुंबातील तरुण सदस्य रोजगारासाठी शहरात किंवा परदेशात गेलेले असतात आणि वृद्ध व्यक्ती गावात एकट्या राहतात.



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, सोमवार, 21 सप्टेंबर 2026



**अष्टविनायक म्हणजे महाराष्ट्रातील आठ मानाची व प्रतिष्ठेची गणपतीची देवळे आहेत**

पश्चिम महाराष्ट्र व कोकणात असलेल्या ह्या देवळांना स्वतंत्र इतिहास आहे. या सर्व देवळांना पेशव्यांचा आश्रय असल्यामुळे त्यांना पेशवाई-च्या काळात महत्त्व प्राप्त झाले. मुद्गल पुराणातही अष्टविनायकांचे वर्णन आढळते.

महाराष्ट्रातील या विशिष्ट 'आठ' ठिकाणच्या गणेश मंदिरांना, मूर्तींना खास महत्त्व आहे. या आठ मंदिरांस मिळून 'अष्टविनायक' म्हणले जाते. अष्टविनायकांची मंदिरे (स्थळे) महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतात प्रसिद्ध आहेत.

**गणपती ही विद्येची देवता असून तो, सुख-कर्ता, दुःखहर्ता आणि रक्षणकर्ता आहे अशी गणेश भक्तांची भावना आहे.**



श्री गणेशाच्या अनेक प्रतिमा (मूर्ती) तयार केल्या गेल्या परंतु दगडावर कोरीवकाम करून निर्माण केलेल्या प्राचीन मूर्तींचा शोध ज्या ठिकाणी लागला, तसेच जेथे 'स्वयंभू' प्राचीनतम मूर्ती सा-पडल्या अशा स्थळांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. याच मंदिरांना अष्टविनायकांची मंदिरे समजले जाते. महाराष्ट्रातील असंख्य भाविक अष्टविनाय-काची यात्रा करतात. अष्टविनायकाची सर्व मंदिरे ही अंतराच्या दृष्टीने परस्परांच्या जवळ आहेत. साधारणपणे दीड ते दोन दिवसांत ही अष्टविना-यक यात्रा पूर्ण होऊ शकते. पुणे जिल्ह्यात पाच (मोरगाव, थेऊर, रांजणगाव, ओझर, लेण्याद्री), रायगड जिल्ह्यात दोन (महड, पाली) व अहमदनगर जिल्ह्यात एक (सिद्धटेक) या ठिकाणी 'अष्टवि-नायक स्थाने' आहेत. या गणपतींपैकी महड, सि-द्धटेक व रांजणगावचा गणपती हे उजव्या सोंडेचे आहेत. बाकीचे डाव्या सोंडेचे. या सर्व गणपतींची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे -

## पालीचा बल्लाळेश्वर

पालीचा गणपती हा अष्टविनायकांपैकी आठवा गणपती आहे
या गणपतीला श्री बल्लाळेश्वर म्हणतात. बल्लाळेश्वर गणपतीचे हे स्वयंभू स्थान आहे.
मंदिर पूर्वाभिमुख आहे. गणेशाचे कपाळ विशाल असून डोळ्यात हिरे आहेत. मंदिर चिरेबंदी आहे. मंदिरात प्रचंड घंटा असून ती चिमाजी अप्पांनी अर्पण केली आहे.
हे स्थान रायगड जिल्ह्यातील सुधागड तालु-क्यात असून, सुधागड या भव्य किल्ल्याची पार्श्वभूमी व अंबा नदीच्या निसर्गरम्य सा-न्निध्यात बल्लाळेश्वराचे मंदिर वसले आहे. पालीपासून जवळच उन्हेरचे गरम पाण्याचे झरे व सरसगड हा प्राचीन किल्ला आहे. पाली खोपोलीपासून ३८ कि. मी. अंतरावर आहे तर पुण्यापासून १११ कि. मी. अंतरा-वर आहे. खोपोली - पेण रस्त्यावर पालीस जाण्यास रस्ता फुटतो, तर पनवेल - गोवा या राष्ट्रीय महामार्गावर वाकणपासून पालीस रस्ता जातो.
भाद्रपद महिन्यातील चतुर्थीला या आठही ठिकाणी यात्रा भरते. सर्व जाती-धर्माचे लोक या ठिकाणी येऊन श्रद्धापूर्वक दर्शन घेतात. भाद्रपद शुद्ध चतुर्थी ते अनंत चतुर्दशी या काळात श्री गणेशाचा उत्सव सर्वत्र साजरा केला जातो.



# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त
# परळीत 'सेवा संकल्प अभियान'

### ना. पंकजाताई मुंडे यांच्या उपस्थितीत प्रा. पवन मुंडे यांच्या पुढाकारातून सेवा सन्मान आणि महिला सक्षमीकरणाचा जागर



**परळी / प्रतिनिधी-**

पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त परळी वैजनाथमध्ये 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत असून, या अभियानाच्या माध्यमातून सामाजिक सेवा, महिला सक्षमीकरण आणि विविध सामाजिक घटकांच्या सन्मानाला प्राधान्य देण्यात आले आहे. भारतीय जनता पार्टी, परळी वैजनाथच्या वतीने प्रा. पवनकुमार मुंडे यांच्या संयोजनातून 17 सप्टेंबर ते 17 ऑक्टोबर या कालावधीत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

सेवेच्या माध्यमातून समाजाशी जोडले जाण्याचा आणि सामाजिक उपक्रमांना व्यापक स्वरूप देण्याचा संकल्प प्रा. पवन मुंडे यांच्या पुढाकारातून करण्यात आला आहे.पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त केवळ शुभेच्छा न देता विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून सेवा करण्याचा हा उपक्रम असल्याने अभियानाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.



या अभियानातील प्रमुख कार्यक्रम शनिवार, दि. 26 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 11वाजता औद्योगिक वसाहत सभागृह, नाथ रोड, परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरणमंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**महिला सक्षमीकरणाला विशेष प्राधान्य**

अभियानाचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महिला सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणारा विशेष उपक्रम. आरटीओ कार्यालय, अंबाजोगाई यांच्या सहकार्याने महिलांना मोटार वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देऊन वाहन परवाना मिळवून देण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. महिलांना स्वावलंबी आणि आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**अंगणवाडी सेविकांचा होणार सन्मान**

समाजातील तळागाळापर्यंत सेवा पोहोचविणाऱ्या अंगणवाडी सेविकांच्या योगदानाची दखल घेत त्यांचा सत्कार व सन्मान करण्यात येणार आहे. बालकांचे संगोपन, पोषण आणि जनजागृतीच्या कार्यात योगदान देणाऱ्या सेविकांच्या कार्याचा गौरव या माध्यमातून करण्यात येणार आहे.

**रांगोळीच्या रंगातून 'विकसित भारत'चा संदेश**

अभियानांतर्गत रांगोळी स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले असून, केंद्र व राज्य शासनाच्या विविध जनकल्याणकारी योजना तसेच 'विकसित भारत' या संकल्पनेचा संदेश रांगोळीच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**प्रा. पवन मुंडे यांच्या पुढाकारातून सेवेला कृतीची जोड**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त महिनाभर चालणाऱ्या या अभियानातून सेवा, सन्मान आणि स्वावलंबनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. विविध सामाजिक घटकांना एकत्रित करून त्यांना अभियानाशी जोडण्याचे काम प्रा. पवनकुमार मुंडे यांच्या संयोजनातून केले जात आहे.

सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत सेवा कार्याला संघटित स्वरूप देण्याचा हा प्रयत्न असून, परळीतील नागरिक, महिला, अंगणवाडी सेविका आणि विविध सामाजिक घटकांचा सहभाग या अभियानात राहणार आहे. मोदीजींच्या वाढदिवसानिमित्त सुरू झालेले हे अभियान 'सेवा, सन्मान आणि स्वावलंबन' या त्रिसूत्रीच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्याला नवी दिशा देणारे ठरणार आहे.

# पंचशील नगरच्या वैद्यनाथ गणरायाची प्रा. टी. पी. मुंडे यांच्या हस्ते आरती

### सहपत्निक आरती; दुष्काळाचे सावट दूर होऊन सुख-समृद्धी नांदो, यासाठी श्रीचरणी प्रार्थना

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

पंचशील नगर येथील वैद्यनाथ गणेश मंडळाच्या गणरायाची आरती प्रा. टी. पी. मुंडे सर यांच्या हस्ते भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. प्रा. टी. पी. मुंडे यांनी सहपत्निक गणरायाची आरती करून सर्वांच्या सुख, समृद्धी व आरोग्यासाठी श्रीचरणी प्रार्थना केली.

यावेळी "दुष्काळाचे सावट दूर होऊन सर्वत्र समाधानकारक पाऊस पडू दे आणि सर्वांच्या जीवनात सुखाचे दिवस येऊ दे," अशी मनोभावे प्रार्थना श्री गणरायाच्या चरणी करण्यात आली.

आरतीनंतर उपस्थित भाविक भक्तांना मुंडे कुटुंबीयांच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

यावेळी प्रा. टी. पी. मुंडे सर यांच्या पत्नी शिवशल्या त्रिंबक मुंडे, प्रा. विजय मुंडे, सोनिया विजय मुंडे, प्रदीप भैय्या (बबलू शेठ) मुंडे, शिल्पा प्रदीप मुंडे, प्रियदर्शनी विजय मुंडे, नंदनी प्रदीप मुंडे, पवनराजे विजय मुंडे, प्रतापराजे प्रदीप मुंडे



यांच्यासह मुंडे कुटुंबीय उपस्थित होते.

तसेच वैद्यनाथ गणेश मंडळाचे अध्यक्ष राहुल कराड यांचीही यावेळी प्रमुख उपस्थिती होती. आरती, गणरायाचे दर्शन आणि महाप्रसादामुळे पंचशील नगर परिसरात भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

# अवैध देशी-विदेशी दारू विक्रीविरुद्ध आष्टी पोलिसांची धडक कारवाई

### पाच ठिकाणी छापे; पाच आरोपींवर गुन्हे दाखल, 51 हजार 510 रुपयांचा दारूसाठा जप्त

**आष्टी | प्रतिनिधी**

आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैधरीत्या देशी-विदेशी दारूची विक्री करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी शनिवारी (दि. १९) विशेष मोहीम राबवत धडक कारवाई केली. विविध ठिकाणी छापे टाकून पाच आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (ई) अन्वये पाच स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईत एकूण ५१ हजार ५१० रुपये किमतीचा दारूसाठा जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देसूर येथील आष्टी-बीड-सांगवी रोडलगत असलेल्या शांताई किराणा दुकानात अवैध दारू विक्री करताना अंकुश विठ्ठल आबनावे (वय ५०, रा. देसूर) याला पकडण्यात आले. त्याच्याकडून ९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच डोईठाण शिवारातील बीड-अहिल्यानगर रोडलगत हॉटेल तारांगण येथे अवैध दारू विक्री करताना अंकुश नारायण सांगळे (वय ४६, रा. बावी) याच्याकडून



१० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्याच परिसरातील हॉटेल संकेत येथे बद्रीनाथ रामहरी भोसले (वय ४६, रा. सांगवी पाटण) याच्याकडून १२ हजार १० रुपयांचा दारूसाठा जप्त करण्यात आला.

सांगवी पाटण शिवारातील बीड-अहिल्यानगर रोडलगत हॉटेल सनी पॅलेस येथे कारवाई करत सचिन महादेव राजपुरे (वय ३१, रा. सांगवी पाटण) याच्याकडून ९ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तर कारखेल बु. शिवारातील हॉटेल जिव्हाळा येथे वैभव मोहन पवार (वय २३, रा. कारखेल बु.) याच्याकडून ९ हजार ७५० रुपयांचा दारूसाठा जप्त करण्यात आला.

# आ. सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली त्रिपक्षीय करारासाठी आंदोलनाची हाक

### करार करा, अन्यथा गळीत हंगाम रोखू; उसतोड संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप यांचा इशारा

**आष्टी (प्रतिनिधी) :**

ऊसतोडणी व वाहतूक कामगार तसेच मुकादमांच्या हक्काच्या मागण्यांसाठी पुन्हा एकदा संघर्षाची भूमिका घेण्यात आली असून,

लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेचे संघटक आ.सुरेश धस यांच्या नेतृत्वाखाली ऊसतोड कामगारांच्या मागण्यांसाठी लढा उभारण्यात येणार असल्याचे लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप यांनी सांगितले. नव्याने त्रिपक्षीय करार झाल्याशिवाय राज्यातील साखर कारखान्यांचा आगामी गळीत हंगाम सुरू करू देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

ऊसतोडणी व वाहतूक कामगार आणि मुकादमांच्या विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगारमंत्री, सहकारमंत्री, साखर आयुक्त, सहकार आयुक्त, समाजकल्याण आयुक्त तसेच साखर संघाचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक यांना संपाची नोटीस देण्यात आली आहे.

राज्यातील ऊसतोडणी व वाहतूक कामगार तसेच



मुकादमांच्या हक्काच्या सेवा-सुविधांबाबत २७ ऑक्टोबर २०२३ रोजी त्रिपक्षीय करार करण्यात आला होता. तीन वर्षांसाठी करण्यात आलेल्या या कराराची मुदत २०२५-२६ च्या गळीत हंगामात संपली आहे. त्यामुळे २०२६-२७ च्या गळीत हंगामाला सुरुवात होण्यापूर्वी नव्याने त्रिपक्षीय करार करावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.



नव्या करारात ऊसतोडणी कामगारांना प्रति टन ६०० रुपये मजुरी देण्यात यावी, वाढलेल्या डिझेल दर व वाहन देखभालीचा खर्च लक्षात घेऊन ऊस वाहतूक दरात शंभर टक्के वाढ करावी, मुकादमांच्या कमिशनमध्ये ३५ टक्के वाढ करावी, अशी प्रमुख मागणी आहे. तसेच कामगार कल्याण मंडळाकडे नोंदणी करून ओळखपत्र व सेवापुस्तिका देण्यात यावी, मागील तीन वर्षांचा प्रति टन दहा रुपयांप्रमाणे निधी कामगार कल्याणकारी महामंडळाकडे जमा करावा, कामगारांना भविष्य निर्वाह निधीची सुविधा द्यावी आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती सुरू करावी, अशा मागण्याही करण्यात आल्या आहेत.

स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे यांनी ऊसतोड कामगारांच्या हक्कासाठी आयुष्यभर संघर्ष केला. त्याच चळवळीचा वारसा पुढे नेत आज आ. सुरेश धस हे ऊसतोड कामगारांच्या प्रश्नांवर आमच्या सोबत खंबीरपणे उभे आहेत. त्यांच्या नेतृत्वाखालीच कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी ही लढाई पुढे नेणार आहोत. त्रिपक्षीय करार झाल्याशिवाय गळीत हंगाम सुरू करू देणार नाही,असा निर्धार

लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप यांनी व्यक्त केला.

गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी शासनाने कामगारांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन त्रिपक्षीय करार करावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.